Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ११, अंक २७ ] बुधवार, सप्टेंबर १७, २०२५/भाद्रपद २६, शके १९४७ [पृष्ठे २, किंमत : रुपये ६२.००

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

# भाग एक—अ-अमरावती विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २६८.

**लवाद, नगर रचना योजना, वणी क्र. १, नगर परिषद, यांजकडून**

**नगर रचना योजना, वणी क्रमांक ०१ (प्रारुप-प्राथमिक)**

**जाहिर प्रकटन**

क्रमांक न.र.यो.-वणी क्र. ०१-२७.—

महाराष्ट्र नगर रचना योजना नियम, १९७४ मधील नियम १३ अन्वये याद्वारे जाहिर करण्यात येते की, खालील सही करणाऱ्यांनी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ७२ (३), (४), (५), (७) अन्वये मंजूर प्रारूप नगर रचना योजना वणी क्र. ०१ च्या मसुद्यावर अनुसरून नगर रचना योजना, वणी क्र. ०१ (प्रारुप-प्राथमिक) योजना तयार केलेली आहे. वरील प्रारुप प्राथमिक योजना दिनांक १८ ऑगस्ट, २०२५ रोजी या कार्यालयात प्रसिद्ध करण्यात आली आहे.

सदर प्रारुप प्राथमिक नगर रचना योजना, वणी क्र. ०१, लवाद यांचे नगर परिषद कार्यालय, वणी येथील कार्यालयात तसेच वणी नगर परिषदेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत जनतेला अवलोकनार्थ उपलब्ध करण्यात आलेली आहे.

सदर प्रारुप प्राथमिक नगर रचना योजना, वणी क्र. ०१ तयार करताना, कलम ७२ (४) प्रमाणे आवश्यक कार्यवाही करून, लवाद यांनी शासन मंजूर प्रारुप नगर रचना योजना, वणी क्र. ०१ च्या मसुद्यामध्ये जमिनीच्या/मूळ भूखंडाच्या आणि त्यांच्या अंतिम भूखंडाच्या मालकी हक्कामध्ये/हितसंबंधामध्ये कोणतेही बदल प्रस्तावित केलेले नाहीत.

सर्व भूखंडासंदर्भात तपशील मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी मंजूर प्रारुप नगर रचना योजना, वणी क्र. ०१ प्रमाणे कायम ठेवण्यात आले आहेत.

वरीलप्रमाणे नगर रचना योजना, वणी क्र. ०१ (प्रारुप-प्राथमिक) या योजनेतील सर्व भूखंडाबाबतचे लवादाचे निर्णय

सर्व हितसंबंधीत व्यक्तींना नमुना ४ (अ) मध्ये स्वतंत्रपणे कळविण्यात येत आहेत.

आता, कलम ७२ (५) मधीत तरतुदीप्रमाणे, लवाद यांच्याकडून सदरहू प्रारुप प्राथमिक नगर रचना योजना, वणी क्र. ०१, मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे, उक्त अधिनियमाच्या कलम ८६ अन्वये मंजुरीसाठी सादर करण्यात आलेली आहे.

**मनोहर कि. नकाशे,**
लवाद,
नगर रचना योजना, वणी क्र. ०१,
नगर परिषद, वणी.

वणी :
दिनांक १० सप्टेंबर, २०२५.

---

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २६९.

BY ARBITRATOR, TOWN PLANNING SCHEME, WANI NO. 1,
MUNICIPAL COUNCIL

**Town Planning Scheme, Wani No. 01 (Draft Preliminary)**

*PUBLIC NOTICE*

No.TPS-Wani No. 1-27.–

It is hereby notified as required by rule 13 of the Maharashtra Town Planning Scheme Rules, 1974 that the undersigned has on this 18th August, 2025 day has published the Town Planning Scheme, Wani No. 01 (Draft Preliminary) in respect of the sanctioned Draft Town Planning Scheme, Wani No. 01, as drawn up under the provisions of section 72 (*3*), (*4*), (*5*), (*7*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

The Draft Preliminary Town Planning Scheme drawn up by Arbitrator, is kept open for inspection of the public during office hours on all working days in the office of the Arbitrator, Town Planning Scheme, Wani No. 01, at Municipal Council, Wani and also in the office of the Municipal Council, Wani.

While preparing the said Draft Preliminary Town Planning Scheme, Arbitrator by taking necessary action as per section 72 (*4*), has not proposed any change in the ownership/interest of the lands/original plots and its final plots in the Government sanctioned Draft Town Planning Scheme, Wani No. 01.

Details regarding all plots has been maintained as per the Draft Town Planning Plan, Wani No. 01 approved by Director of Town Planning, Maharashtra State, Pune.

Relevant decision of the Arbitrator in respect of the plots within the said Draft Preliminary Town Planning Scheme, Wani No. 01, are being communicated to all the concerned interested parties in Form 4A independently.

Now, this Draft Preliminary Town Planning Scheme, Wani No. 01, has been submitted as per section 72 (*5*) by the Arbitrator to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune for sanction under section 86 of the said act.

MANOHAR K. NAKASHE,
Arbitrator,
Town Planning Scheme, Wani No. 01,
Municipal Council, Wani.

Wani :
Dated the 10th September, 2025.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.